





## कार्यालयीन सुधारणा (Office Reform)

## 100 दिवसांचा कृति आराखडा

# सादरीकरण

**श्री. गुलाब खरात,** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा

# बुलढाणा जिल्हा नकाशा आणि सारांश




| | |
|---|---|
| भौगोलिक क्षेत्र (क्षेत्रफळ चौ.किमी.) | 9661 |
| एकूण लोकसंख्या जनगणना (2011) | 2586258 |
| शहरी लोकसंख्या | 548860 (21.22%) |
| ग्रामीण लोकसंख्या | 2037398 (78.78%) |
| गावांची संख्या | 1420 |
| पंचायत समितीची संख्या | 13 |
| ग्रामपंचायतींची संख्या | 870 |
| प्राथमिक आरोग्य केंद्र -कार्यरत | 54 |
| पशुवैद्यकीय दवाखाने | 122 |
| जिल्हा परिषद शाळांची संख्या | 1436 |
| एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय | 14 |
| आरोग्य उपकेंद्र | 282 |

# पर्यटन आकर्षणे



लोणार सरोवर



सिंदखेड राजा - राजमाता माँ जिजाऊ साहेब - जन्मस्थान



श्री संत गजानन महाराज, शेगाव




अंबा बारवा वन्यजीव अभयारण्य





ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य




हनुमान मूर्ती, नांदुरा

# 1. संकेतस्थळ

- अ) जिल्हा परिषदचे अधिकृत संकेतस्थळ वापरण्यातील <u>सुलभ S3WAAS प्रणालीवर</u> अद्यावत करण्यात आले.
- आ) संकेतस्थळावरील <u>कालबाहय माहिती काढून</u> टाकण्यात आली असुन अद्यावत माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
- इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत <u>माहितीचे स्वंयप्रकटीकरण</u> करण्याबाबत 1 ते 17 मुद्यांची मुद्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
- ई) NIC व्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली <u>S3WAAS प्रणाली पुर्णत: सुरक्षित</u>
- उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसुचित <u>ऑनलाईन सेवांची माहिती</u> संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.




www.zpbuldhana.maharashtra.gov.in

## 2. केंद्र शासनाशी सुसंवाद

☞ अ) राज्याच्या विकासाशी संबंधित थेट केंद्र शासनाकडे जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत खाते विभागाकडून कोणतेही प्रस्ताव पाठविण्यात येत नाही.

☞ आ) केंद्रीय योजनांमध्ये वैयक्तिक शौचालयाची कामे 95%, गोबरधन प्रकल्पाची 100% तर सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची 82% कामे पुर्ण, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिलेले उद्दिष्ट 84.53% पर्यंत साध्य, नरेगा अंतर्गत 78% पर्यंत उद्दिष्ट गाठण्यात यश आलेले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत 645 योजनांपैकी 149 योजना पुर्ण झालेल्या असून 496 योजनांची कामे प्रगतीपथावर असून अंतिम टप्प्यात आहेत. राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रमांतर्गत प्राप्त असलेले 11 बायोगॅस सयंत्र उभारणीचे उद्दिष्ट पुर्ण.

☞ इ) केंद्रिय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्रत्यक्षपणे राज्याचे खात्यावर जमा होत असून, केंद्र व राज्याचा एकत्रित निधी राज्य शासनामार्फत PFMS प्रणालीद्वारे प्राप्त होत असतो.

☞ ई) केंद्र शासनाच्या विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळीच कार्यवाही करून अनुपालन सादर करण्यात येते.

# 3. स्वच्छता

☞ अ/आ) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 व महाराष्ट्र जि.प. व पं.स. (अभिलेख्यांचे परिरक्षण, वर्गीकरण व नाशन ) नियम तसेच ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 3 ऑक्टोंबर 2017 नुसार अभिलेख वर्गीकरण, निंदणीकरण व नष्टीकरणाची ची कार्यवाही मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे.

☞ इ व ई ) कालबाहय झालेले निर्लेखनपात्र साहित्य निर्लेखनाची कार्यवाही करण्यात आली असुन निर्लेखनातून जिल्हा परिषदेला अंदाजीत 4.5 लक्ष उत्पन्न मिळाले असुन त्यानूसार जडवस्तु संग्रह नोंदवही अद्यावत करण्यात आली आहे.

☞ उ) जिल्हा परिषदेकडील मुदतबाहय झालेल्या 6 वाहनांची मंजुरी प्राप्त असुन निर्लेखनाची कार्यवाहीकरीता सेलर आयडी मिळण्याकरीता विनंती केली आहे.

**स्वच्छता मोहिम :**

जिल्हा परिषद अंतर्गत सर्व कार्यालयात सुदंर माझे कार्यालय अभियान राबविले

जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शासकीय इमारतींना रंगरंगोटी/किरकोळ दुरुस्तीचे काम करण्यात आले. शासकीय कार्यालयांना नविन फलक बसविले.

# कार्यालयीन स्वच्छता: अभिलेख व्यवस्थापन व साहित्य निर्लेखन

अ



आ



उ





इ



अ





ई



# 4. तक्रार निवारण :

## ☞ आपले सरकार व पी.जी. पोर्टलवरिल तक्रारींचे निराकरण


अ/ आ)

- ☞ तक्रार निवारणासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
- ☞ पोर्टलवर नागरीकामार्फत प्राप्त तक्रारींचा दैंनदिन आढावा घेवुन तक्रारीचा निपटारा
- ☞ आपले सरकार व पी.जी. पोर्टलवर प्राप्त 1234 तक्रारीपैकी 1196 तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या असुन प्रलंबित 38 तक्रारी हया 21 दिवसांच्या आतील आहेत. दि. 1 जानेवारी, 2025 पुर्वीच्या तक्रारी निरंक आहे.

☞ इ) कार्यालयीन कामाकरीता येणा-या अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दीबाबत फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आले आहे.

☞ ई) दर महिन्याला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत असुन माहे डिसेंबर 2024 पर्यंत सर्व तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. नव्याने प्राप्त 1 तक्रार निकाली काढण्याची कार्यवाही सुरु







## 5. कार्यालयीन सोयी सुविधा

- अ) कार्यालयीन कामानिमित्त येणारे नागरीक / अभ्यांगत तसेच कार्यालयीन कर्मचा-यांकरीता स्वच्छ पिण्याच्या पाण्याकरीता आर.ओ. फिल्टर बसविण्यात आले आहे.
- आ/इ) कर्मचारी व अभ्यांगत यांचेसाठी स्वच्छ स्वतंत्र महिला व पुरुष प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- ई) अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालयाची व्यवस्था करण्यात आले असुन महिला अभ्यागता करीता हिरकणी कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे.
- उ) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेत

  कार्यालयाचे सौदर्यीकरण - कार्यालयाचे रंगरंगोटी/ नुतनीकरण, अधिकारी कर्मचारी यांचेकरीता नविन फर्निचर, संगणक उपलब्ध करुन दिले असुन दर आठवडयात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

  जिल्हा परिषद व पं.स. स्तरावर व्ही.सी. रुम तसेच प्रोजेक्टर सुविधा उपलब्ध करुन दिली.



















# 5. कार्यालयीन सोयी सुविधा
















# 6. कामकाजातील सुधारणा

अ) ☞ प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी 2025 पासुन ई. ऑफीस प्रणालीचा वापर करणेबाबत सर्व विभागांच्या 100% कर्मचा-यांचे प्रशिक्षण पुर्ण करून ई ऑफिस द्वारे कामकाज सुरू करण्यात आले.

☞ संगणक हार्डवेअर, प्रिन्टर्स व स्कॅनर्स यांचे खरेदी, इंटरनेट सुविधा

आ) ई.ऑफीस प्रणालीत प्रकरणांचा निपटारा करणेकरीता कनिष्ठ/ सहाय्यक प्रशासन अधिकारी, कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख असे 4 स्तर निश्चित करण्यात आले आहे.

अ




**FILE REGISTER(SUMMARY)**

Period : 01.01.2025 To 13.04.2025 Nature : P/E Department : ZILLA PARISHAD BULDHANA

| S.No. | Section Name | Physical File(P) | Electronic File(E) | Total(P+E) |
|---|---|---|---|---|
| 1 | O/O Additional CEO - ZP Buldhana | 0 | 5 | 5 |
| 2 | O/O CEO - ZP Buldhana | 0 | 1 | 1 |
| 3 | O/O DyCEO (GAD) - ZP Buldhana | 0 | 73 | 73 |
| 4 | ZP Buldhana - Agriculture | 0 | 141 | 141 |
| 5 | ZP Buldhana - Animal Husbandry | 0 | 191 | 191 |
| 6 | ZP Buldhana - CRU | 0 | 2 | 2 |
| 7 | ZP Buldhana - DRDA | 0 | 134 | 134 |
| 8 | ZP Buldhana - Education Primary | 0 | 883 | 883 |
| 9 | ZP Buldhana - Education Scheme | 1 | 5 | 6 |
| 10 | ZP Buldhana - Education Secondary | 0 | 344 | 344 |
| 11 | ZP Buldhana - Finance | 0 | 1935 | 1935 |
| 12 | ZP Buldhana - GAD | 0 | 1873 | 1873 |
| 13 | ZP Buldhana - GSDA | 5 | 161 | 166 |
| 14 | ZP Buldhana - Health | 0 | 412 | 412 |
| 15 | ZP Buldhana - MGNREGA | 0 | 50 | 50 |
| 16 | ZP Buldhana - Minor Irrigation | 0 | 500 | 500 |
| 17 | ZP Buldhana - Rural Water Supply | 0 | 163 | 163 |
| 18 | ZP Buldhana - Social Welfare | 0 | 80 | 80 |
| 19 | ZP Buldhana - Village Panchayat | 0 | 1307 | 1307 |
| 20 | ZP Buldhana - WCD | 0 | 451 | 451 |
| 21 | ZP Buldhana - Works | 0 | 1452 | 1452 |
| | **Total** | **6** | **10163** | **10169** |

## 6. कामकाजातील सुधारणा

☞ इ) सर्व विभागामध्ये ई ऑफीसद्वारे काढलेल्या नस्त्यांची संख्या 10163 असून त्याचे प्रमाण जवळपास 85% पर्यंत आहे.

☞ ई) वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिद्ध झालेल्या बातम्यांबाबत वेळीच खुलासा करण्यात येतो. त्यानुषंगाने आरोग्य विभागाकडील एका बातमीवर खुलासा सादर करण्यात आलेला आहे. अन्य कुठलीही बातमी प्रसिद्ध नाही. जिल्हा परिषदेसंबधित बातम्या नागरीकांपर्यंत पोहचविण्याकरीता संकेतस्थळावर स्वतंत्र शिर्षक तयार केले आहे.

ई



## 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयीन बाबी आणि कृत्रीम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

☞ अ) कार्यरत /नव्याने सेवेत प्रविष्ठ अधिकारी/कर्मचारी यांना आस्थापना विषयक/ वित्तीय बाबी, ई.ऑफीस, ईत्यादी प्रशिक्षण देण्याकरीता जि.प. व प्रत्येक तालुकास्तरावर व्हर्च्युल क्लासरुम ची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा प्रशिक्षण केंद्र /RGSA/ जिल्हा परिषदेमार्फत अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.

☞ आ) 31 मार्च 2024 पर्यंतचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे गोपणीय अहवाल 100% लिहीण्यात आलेले आहेत.

मविसे मधील 11 अधिका-यांचे स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल - महापार प्रणाली लॉगीन तांत्रिक अडचण Saccess Authentication Failed Error येत आहे.

☞ इ) सेवा जेष्ठता याद्यांबाबत 39 संवर्गांपैकी 20 संवर्गाच्या याद्या अंतिम करण्यात आलेल्या आहेत.

पदोन्नत्यामध्ये पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देवून पदस्थापना देण्यात आलेल्या आहेत.

☞ ई) न्यायालयीन प्रकरणांमध्ये 338 प्रकरणांपैकी 280 प्रकरणांमध्ये प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले असून 4 प्रकरणे निकाली निघाली आहेत.

# 7. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयीन बाबी आणि कृत्रीम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- ई विभागीय चौकशी प्रकरणात 176 प्रकरणांपैकी 125 अंतिम चौकशी अहवाल प्राप्त असून 47 प्रकरणांत अंतिम शास्ती आदेश झालेले आहेत 78 प्रकरणांत अहवाल प्राप्त परंतू 45 ACB /FIR शी संबंधित असून 43 प्रकरणात अंतिम शास्तीबाबत कार्यवाही सुरू आहे. (176 - 125 = 51) अद्यापही प्रलंबित 51 (सहा. आयुक्त चौकशी 39 + जिल्हास्तर 12)
- उ कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरासाठी अधिकारी व कर्मचारी यांना या क्षेत्रातील तज्ञामार्फत प्रशिक्षण/कार्यशाळेचे आयोजन करुन त्याचा जास्तीत जास्त वापर करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे.

अ



अ




पायभूत प्रशिक्षण वर्ग सन २०२४-२५
दि. - २१/१०/२०२४ ते २९/११/२०२४

# 8 आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन


- जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या मालकीच्या खालील जिर्ण झालेल्या ईमारती हया इतर संस्थाना बीओटी तत्वावर पुर्नविकास करुन जिल्हा परिषद उत्पादनात 123 कोटींची गुंतवणूक आकर्षिक करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
- त्याव्दारे जिल्हा परिषदेला कायमस्वरुपी उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होणार आहे.












# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 - सुकर जिवनमान

## ☞ नागरी सेवांचे सुलभीकरण

| अ क्र | पूर्विची स्थिती | नागरी सेवांचे स्वरुप | सुलभीकरणानंतर झालेले बदल |
|---|---|---|---|
| 1 | जुन्या रुग्णवाहिकेमुळे आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता अडचणींचा सामना करावा लागत होता. | ग्रामिण भागातील नागरीकांना आरोग्य सुविधेकरीता नविन रुग्णवाहीका | जिल्हयातील 54 प्राथमिक आरोग्य केंद्रात नविन उपलब्ध करुन दिल्याकारणाने आरोग्य सेवा गतीमान झालेली आहे. |
| 2 | जिल्हा परिषद शाळेमध्ये संगीत शिक्षणाकरीता आवश्यक साहित्य तसेच वर्ग उपलब्ध नव्हते. | सुगम पाठशाळा | जिल्हा परिषद शाळांमध्ये हार्मोनियम, तबला व इतर संगित साहित्य CSR मधुन वाटप करण्यात आले.<br>शाळांमध्ये शास्त्रीय संगीत शिक्षणाचे धडे देणे सुरु करण्यात आले |
| 3 | केंद्रीय पातळीवरील NEET & JEE परिक्षांकरिता तज्ञामार्फत मार्गदर्शन उपलब्ध नव्हते. | NEET & JEE परिक्षांकरिता मार्गदर्शन मिशन ZEDD | केंद्रीय पातळीवरील NEET & JEE परिक्षांकरिता तज्ञामार्फत मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. |

# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 - सुकर जिवनमान

## नागरी सेवांचे सुलभीकरण

### I) रुग्णवाहीका

ग्रामिण भागातील नागरीकांना आरोग्य सुविधेकरीता नविन रुग्णवाहीका

जिल्हयातील 54 प्राथमिक आरोग्य केंद्रात नविन उपलब्ध करुन दिल्याकारणाने आरोग्य सेवा गतीमान झालेली आहे.



**देशोन्नती**

**नविन रुग्णवाहिकांचा लोकार्पण सोहळा**

**बुलढाणा :** जिल्हा परिषद आरोग्य विभाग बुलढाणा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात व जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गिते यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातीलआरोग्य संस्थाना नवीन रुग्णवाहिकांचा लोकार्पण सोहळा आज पार पाडला.

रुग्णवाहिका वाहन चालकास चावा देवून वाहनाविषयी समुपदेशन करण्यात आले. यावेळी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलींद जाधव, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. रंजीत मंडाले, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. पुरी तसेच आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. **(जिमाका)**

Buldhana Edition
Nov 29, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

1



# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 - सुकर जिवनमान
## नागरी सेवांचे सुलभीकरण

## II) सुगम पाठशाळा :

- जिल्हयातील विदयार्थ्यांमध्ये संगीत विषयाची गोडी निर्माण व्हावी म्हणुन संगीत शिक्षण या उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद शाळांमध्ये हार्मोनियम, तबला व इतर संगित साहित्य CSR मधुन वाटप करण्यात आले.
- शाळांमध्ये शास्त्रीय संगीत शिक्षणाचे धडे देणे सुरु करण्यात आले.




2





# 9. नाविन्यपूर्ण उपक्रम 1 - सुकर जिवनमान

## नागरी सेवांचे सुलभीकरण

### III. केंद्रीय पातळीवरील NEET & JEE परिक्षांकरिता मार्गदर्शन - मिशन ZEDD

☞ बुलढाणा जिल्हयातील ग्रामीण भागातील हुशार, गरजु व होतकरु इ. 11 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय पातळीवरील NEET & JEE परिक्षांकरिता मोफत कोचींग क्लासेस उपलब्ध करणेकरिता मिशन ZEDD (ZPs Engineer & Doctor Dreamer) राबविण्यात येत आहे. त्यानूषंगाने दि 11/04/2025 रोजी जिल्हयातील 4 केंद्रावर निवड परीक्षा घेण्यात आली. त्यातून 100 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.









# 10. नाविण्यपूर्ण उपक्रम - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा


## I. टपाल व्यवस्थापन प्रणाली

आवक विभागाकडील टपाल संगणीकृत प्रणालीमध्ये नोंदविण्याकरीता सॉफ्टवेअर तयार करण्यात आलेले आहे. संगणीकृत सॉफ्टवेअर मुळे टपालाचे अर्धशासकीय पत्र, तांराकित प्रश्न, लोकआयुक्त, न्यायालयीन प्रकरणे, ई मध्ये वर्गीकरण करणे सोपे झाले असुन सॉफ्टवेअर व्दारे प्राप्त अहवालानुसार टपाल वर नियत्रंण शक्य झाले आहे.




## II. भनिनी खाते उतारा व्यवस्थापन प्रणाली

शालार्थ प्रणालीमधून मिळणारी शिक्षकांचे कपातीची रक्कम सॉफ्टवेअर मध्ये Import करण्याची प्रणाली तयार करण्यात आली आहे. यामुळे सुमारे 5000 शिक्षकांचे भ.नि.नि. कपातीची नोंदणी काही मिनिटामध्ये होवू शकते व मानवी चुका पण टाळता येतात. यामुळे शिक्षकांना त्यांचे हिशोबपत्रिका तात्काळ वितरीत करण्यास मदत झालेली आहे.




धन्यवाद.